महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
☎ 🖷:- -022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

**कार्यालयीन आदेश क्रमांक ९० दिनांक 8 JAN 2010**

विषयः- स्थानिक निधी लेखा संस्थांचे लेखापरीक्षणास सुधारीत श्रमदिन देणेबाबत.

स्थानिक संस्थांचे लेखापरीक्षण करण्यासाठी निश्चित करावयाच्या श्रमदिनाबाबत जमा / खर्च पावत्यांच्या संख्येनुसार श्रमदिन निश्चित करावेत. याअनुषंगाने लेखापरीक्षणास परवानगी देतांना सुरूवातीस सध्याच्या एकूण निश्चित केलेल्या श्रमदिनापैकी ५०% श्रमदिन मंजूर करावे. प्रत्यक्ष लेखापरीक्षणामध्ये उपलब्ध होणा-या लेखापरीक्षणाधीन तीन महिन्याच्या एकूण पावत्या व प्रमाणके यांच्या संख्येनुसार पुढील श्रमदिन ठरविण्यात यावे. याबाबत श्रमदिन निर्धारण समितीच्या शिफारशी विचारात घ्याव्यात. कोणत्याही संस्थेस कायम स्वरुपी श्रमदिन मंजूर नाहीत याची नोंद घ्यावी.

२. जिल्हा परिषद आरोग्य, शिक्षण, एकात्मिक बालविकास इत्यादी विभागाकडून बांधकामासाठी निधी बांधकाम विभागाला वितरीत केला जातो. एकदा प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पुढील सर्व अभिलेखे बांधकाम विभागाकडे असतात. निधी जरी संबंधित विभागाचा असला तरी त्याचे लेखापरीक्षण करण्यासाठीचे मनुष्यदिन त्या विभागातून कमी करून बांधकाम विभागाकडे देण्यात यावी व परिच्छेद बांधकाम विभागाच्या अहवालात अंतर्भूत करावा. आरोग्य, शिक्षण, एकात्मिक बालविकासाच्या व अन्य विभागाचे लेखापरीक्षण अहवालात वितरीत निधी नमूद करून परिच्छेद बांधकाम विभागात समाविष्ठ करावा. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद यांनी यापूर्वी निश्चित केलेले श्रमदिन मंजूर न करता त्यांचे लेखापरीक्षणासाठी लागणारे मंजूर श्रमदिन हे जमा व खर्चाच्या पावत्या व प्रमाणके यांच्या संख्येनुसार मुख्य लेखापरीक्षक यांनी विहित केलेल्या निकषाद्वारे निश्चित करावेत. यापुढे या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी सुरूवातीला मंजूर श्रमदिनाच्या ५०% श्रमदिन प्रथमतः मंजूर करून उर्वरित श्रमदिन पावत्या व प्रमाणकाच्या संख्येनुसार ठरवून दिलेल्या निकषांद्वारे परिगणीत करून त्यास विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांची मान्यता घेण्यात यावी.

३. ग्रामपंचायत लेखापरीक्षण करतांना ग्रामनिधीमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व रकमांचे लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा निधी, वित आयोग इत्यादीतून प्राप्त होणारे निधीचे सुध्दा लेखापरीक्षण करणे अनिवार्य आहे. या सर्व निधीची माहिती संबंधीत जिल्हा उपमुख्य लेखापरीक्षक यांनी सर्व पंचायत समितींकडून मुंबई ग्रामपंचायत अंदाजपत्रक व हिशेब नियम १९५९ खाली विहित नमूना ३ व ४ मधील माहिती लेखापरीक्षण सुरू करण्यापूर्वी प्राप्त करून घेऊन त्यानंतरच संबंधित लेखापरीक्षण दौरा निश्चित करावा. तसेच ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी लागणारे श्रमदिन जमा / खर्चाच्या पावत्या व प्रमाणके यांच्या आधारावर निर्धारीत केल्याप्रमाणे निश्चित करावेत.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य

प्रतः-
१. सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा नाशिक
या आदेशातील परिच्छेद ३ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे गट विकास अधिका-याकडून माहिती मागविण्यासाठी त्यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

वि com hcl ASA letter १११०